# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १२८-२२** **दिनांक :- ०४/०५/२०२२**

## मीरा-भाईंदर,वसई-विरार पोलीसांचे वतीने शांतता राखणेबाबत जाहीर आवाहन.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे वतीने सर्व नागरिकांना जाहीर आवाहन करण्यात येत आहे की, जातीय सलोख्यात तेढ निर्माण होईल असे वक्तव्य अथवा सामाजिक माध्यमांवरती संदेश, फोटो किंवा व्हीडीओ प्रसारित करण्यात येऊ नये तसेच सध्याच्या राजकीय व धार्मिक हालचालींच्या पार्श्वभुमीवर कोणीही कायदा हातात घेवु नये. जो कायदयाचे उल्लघंन करील किंवा सार्वजनिक शांततेचा भंग करताना मिळुन येईल त्याचेवर प्रचलित कायदयाचे अनुषंगाने सक्त कारवाई करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पोलीसांचे अभिलेखावरील सराईत गुन्हेगार व समाजकंटक यांचेवर प्रचलित कायदयानुसार योग्य ती प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली असून कायदा व सुव्यवस्था बिघडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या इसमांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४९ प्रमाणे १०० पेक्षा जास्त नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत.

सध्याच्या राजकीय व धार्मिक हालचालींच्या पार्श्वभुमीवर मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयात शांतता राखण्याच्या उद्देशाने आयुक्तालयातील सर्व अधिकारी व अमंलदार यांच्या पुढील आदेशापावेतो रजा बंद करण्यात आल्या असुन कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने पोलीस अधिकारी, पोलीस अमंलदार, एसआरपीएफ प्लाटुन व होमगार्ड बंदोबस्ताकरीता तैनात करण्यात आलेले आहेत.

सध्या मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आुयक्तालयात कलम ३७ (१) (३) महाराष्ट्र पोलीस कायदा प्रमाणे प्रतिबंधक आदेश लागु करण्यात आले असून कोणीही विनाकारण जमाव जमवु नये याची सर्वांनी दक्षता घ्यावी तसेच कायदा व सुव्यवस्थेचे भान राखुन आपआपल्या परिसरात शांतता राखावी व जातीय सलोखा अबाधित ठेवावा असे आवाहन मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयातर्फे करण्यात येत आहे.

---ooo---